प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

City _26 Oct_013
26 Oct 2024

# शिक्षण, उद्योग, नैतिकतेवरच भविष्याचा पाया

## ज्येष्ठ उद्योजक डॉ. अभय फिरोदिया : विश्वकर्मा विद्यापीठाचा सहावा दीक्षांत समारंभ

प्रभात वृत्तसेवा



पुणे : विश्वकर्मा विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभावेळी उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थी.

**पुणे, दि. २५** - शिक्षित तरुण पिढीच्या भविष्याचा पाया हा शिक्षण, उद्योग आणि नैतिकता यावर आधारित असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ उद्योजक डॉ. अभय फिरोदिया यांनी केले. ते विश्वकर्मा विद्यापीठाच्या सहाव्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी विश्वकर्मा विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल, विद्यापीठाचे उपाध्यक्ष डॉ. वासुदेव गाडे, संचालक मंडळाचे सदस्य बजरंगदास लोहिया, कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे, विद्यापीठातील अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. फिरोदिया म्हणाले, शिक्षण हा तुमच्या प्रवासाचा आरंभबिंदू असला तरी, यशस्वी जीवनासाठी उद्योग आणि नैतिकतेचा अंगीकार करणे महत्त्वाचे आहे. तरुणांनी भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगावा आणि ती कायम टिकून राहील याचा आत्मविश्वास बाळगावा. भरत अगरवाल यांनी विद्यार्थ्यांना नात्यांचा सन्मान आणि संवाद राखण्याचे आणि जीवनात उपयोगी पडेल, अशी एक बांधिलकी तयार करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. मागील वर्षातील विद्यापीठाच्या कामगिरीचा आढावा कुलगुरू डॉ. जबडे यांनी घेतला. या समारंभात एकूण ८२८ विद्यार्थ्यांना पदवी आणि पीएच. डी. देण्यात आल्या.